# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

## पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(0240)2334216(P) 2334769(O) Fax-2356820

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त


जाक्रं विकाऔ/शिक्षण/११/ ६०७३

दिनांक - /०७/२०११ 25 JUL 2011

प्रति,
खाजगी विना-अनुदानित
पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका
अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : सामाजिक मागास विदयार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची अकारणी न करण्याबाबत.

संदर्भ : मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रं.02/एडीएम/2011/927 दिनांक 18 जुलै 2011.

महोदय,

उपरोक्त विषयी मा.संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र आणि त्या सोबत महाराष्ट्र शासनाचे दिनांक 15 जुलै 2011 चे सहपत्र सुलभ संदर्भासाठी जोडण्यात येत आहे.त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की,व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष 2011-12 मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिये मार्फत प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश देतांना कोणतेही शिक्षणशुल्क आकारणी करु नये. तसेच एआयईईई कोटयातुन प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय विदयार्थ्यांनाही शिक्षण शुल्क आकारणी करण्यात येऊ नये.

सोबत :(02)

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाच्या प्रोग्रॅमर यांना सूचित करण्यात येते की सदरील पत्र सहपत्रासह
Consession in fees to Backwad class students for the yr 2011-12
या शिर्षाखाली या कार्यालयाच्या संकेतस्थळावर माहितीसाठी उपलब्ध करुन दयावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — ३०३३३४४७ /४२२/४९१ फॅक्स -२२६९ २१०२/२२६९००७.

तार · EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांकः २अ/एडीएम/२०११/ ९२७

दिनांक : 18 JUL 2011

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

**विषयः- सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत..**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, खाजगी विनाअनुदानीत शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांत शिकणा-या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या सामाजिक घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये शासनाच्या विचाराधीन आहे असे शासनाने पत्र क्रमांक उच्च व तंत्रशिक्षण विभाग, टिईएम२०११/(१८७/११)/तांशि-४, दिनांक १५जुलै,२०११ अन्वये संचालनालयास कळविले आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये मार्फत प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय प्रवर्गातून उमेदवारांकडून प्रवेश घेताना कोणतेही शिक्षण शुल्काची आकारणी करु नये अशा सूचना देण्यात याव्यात. शिक्षण शुल्काची सवलत एआयईईई कोटयातून प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांनाही लागू आहे ही बाबही संस्थांना कळविण्यात यावी.

(डॉ. सु. का. महाजन)

प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रतः मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मन्त्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी .

D:\Budage\2011-12\Miscelenius\Tution fee circular.doc

# महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र. टिईएम-२०११/(१८७/११)/तांशि-४
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १५ जुलै, २०११.

प्रति,
संचालक (तंत्रशिक्षण),
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची <u>आकारणी न करण्याबाबत.</u>**
**पदवी अभ्यासक्रमाच्या सीईटीबाबत**

खाजगी विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांत शिकणा-या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या सामाजिक घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून लागू केली आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१० व २०१०-११ मध्ये पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे. चालू वर्षी योजनेबाबतचा शासन निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

२. या संदर्भात शासनामार्फत अंतिम निर्णय होण्यास काही अवधी लागणार असून दरम्यान व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असल्याने या व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेश घेणाऱ्या सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची आकारणी संस्थांनी करु नये. या संदर्भात संबंधित संस्थांना तशा सूचना देण्याची कार्यवाही संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांनी करावी. तसे संबंधित विभागीय सहसंचालकांना प्रभारी सहसंचालकांनी तात्काळ कळवावे.

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

*C:\Documents and Settings\v\My Documents\TE 4\Letter\Misc.doc*